# महाराष्ट्र शासन

क्रमांक : जमीन-२०१६/प्र.क्र.३२९/ज-१
महसूल व वन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक :- १७ एप्रिल, २०१७.

प्रति,

विभागीय आयुक्त,
कोकण विभाग/ पुणे विभाग/ नाशिक विभाग/औरंगाबाद विभाग/
नागपूर विभाग/ अमरावती विभाग

**विषय:-** नागपूर-मुंबई शीघ्रसंचार द्रुतगती मार्गासाठी आणि राज्य शासनाच्या कोणत्याही विभागाकडून, राज्य शासनाच्या मान्यताप्राप्त सार्वजनिक प्रकल्पांसाठी, जमिनीचे संपादन करण्यानुषंगाने, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम-३६अ खालील अधिकारांचे प्रत्यायोजन करण्याबाबतची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करण्याबाबत....

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भातील अधिसूचना, महाराष्ट्र शासन, असाधारण राजपत्र, भाग-४ ब मध्ये गुरुवार दिनांक १३/०४/२०१७ मध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर शासन राजपत्राची प्रत पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

आपला,
राजेंद्र क्षीरसागर
**(राजेंद्र क्षीरसागर)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

सोबत : वरील प्रमाणे

प्रत-

१) उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,मर्यादित, के.सी.मार्ग, वांद्रे (पश्चिम),मुंबई-३०
२) सर्व जिल्हाधिकारी
३) निवडनस्ती (ज-१) कार्यासन

RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ३, अंक ३८(२)] गुरुवार, एप्रिल १३, २०१७/चैत्र २३, शके १९३९ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ८६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश**

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १३ एप्रिल २०१७

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६.**

क्रमांक जमीन-२०१६/प्र.क्र.३२९/ज-१.—महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) याच्या कलम ३३०अ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सक्षम करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे असे निदेश देते की, उक्त संहितेच्या कलम ३६अ खालील आदिवासी व्यक्तींनी धारण केलेल्या जमिनीचा, धारणाधिकार याची विक्री अथवा हस्तांतरण यास पूर्व मान्यता देण्याचे राज्य शासनाचे अधिकार हे जेथवर,—

(क) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून नागपूर-मुंबई शीघ्रसंचार द्रुतगती मार्गासाठी (महाराष्ट्र समृद्धी महामार्ग), महाराष्ट्र महामार्ग अधिनियमांन्वये (१९५५चा ५५) जमीन एकत्रीकरण योजनेअंतर्गत (लॅन्ड पुलिंग योजनेद्वारे) किंवा थेट खरेदीद्वारे किंवा भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (सन २०१३ चा अधिनियम ३०) खाली भूसंपादनाद्वारे जमीन संपादन करताना पूर्वपरवानगी देण्याशी संबंधित असतील, तेथवर ; आणि

(ख) राज्य शासनाच्या कोणत्याही विभागाकडून राज्य शासनाच्या मान्यताप्राप्त सार्वजनिक प्रकल्पांसाठी थेट खरेदीद्वारे किंवा भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (सन २०१३ चा अधिनियम ३०) खाली भूसंपादनाद्वारे जमीन संपादन करताना पूर्वपरवानगी देण्याशी संबंधित असतील, तेथवर ;

ते अधिकार, संबंधित महसूल विभागाच्या विभागीय आयुक्त यांना त्यांच्या अधिकारितेच्या हद्दींच्या आत, शासनाने वेळोवेळी दिलेल्या कोणत्याही सर्वसाधारण अथवा विशेष आदेशांना अधीन राहून, वापरण्याजोगे देखील असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मनु कुमार श्रीवास्तव,**
शासनाचे प्रधान सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated 13th April 2017

*NOTIFICATION*

MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966.

No.Jamin-2016/C.R.329/J-l.—In exercise of the powers conferred by section 330A of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby directs that the powers conferred on it, under section 36A of the said Code relating to the grant of prior approval for the sale or transfer of occupancy of the tribal to,—

(*a*) the Maharashtra State Road Development Corporation for the purpose of construction of the Nagpur-Mumbai Super Communication Expressway (Maharashtra Samruddhi Mahamarg) by implementing the Land Pooling Scheme under the Maharashtra Highways Act ( LV of 1955 ), or by way of purchase of land or acquisition of land under the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition Rehabilitation and Resettlement Act, 2013 (30 of 2013) ; or

(*b*) any State Government Department for a public project approved by the State Government, by way of purchase of land or acquisition of land under the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition Rehabilitation and Resettlement Act,2013 (30 of 2013) ;

shall also be exercisable by the Divisional Commissioner of the concerned Revenue Division, subject to the general or special orders, if any, issued by the Government in this regard, from time to time.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

MANU KUMAR SRIVASTAVA,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.